# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 14.03.2013 (का.प.क्र.30) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक 14.03.2013 (का.प.क्र.30) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दूपारी 12.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा शहर अभियंता श्री.एम.डी.सोनवणे, विधी सहाय्यक तथा प्र.नगर सचिव, श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
06. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
07. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
08. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
09. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
10. स. श्री. खान अक्रम करीम खान
11. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
12. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप
13. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

**चर्चा :**

मा.सभापती :रेल्वेस्टेशन क्रांतीचौक येथील रोडचे काम संथगतीने का सुरू आहे.

श्री.फड :ऑपरेटरची समस्या निर्माण झाल्यामुळे काम बंद आहे. लवकरच युध्दपातळीवर काम सुरू होईल.

मा.सभापती :वॉटरलाईनची समस्या निर्माण झालेली आहे खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता :काम संथगतीने होण्याचे दोन मुख्य कारण आहे विद्युत आणि पाणीपुरवठा लाईन. विद्युत कामाबाबत आदेश देण्यात आलेले आहे.

मा.सभापती :पोल शिफ्टींगबाबत खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता (विद्युत) :पोलशिफ्टींगबाबत मार्कआऊट देण्यात आलेले आहे. 2 टक्के भरणा करण्याचा खर्चही अदा करण्यात आलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :वार्ड क्रमांक 59 खोकडपुरा ते देवगीरी कॉलनीच्या मनपाच्या खुल्या जागेवर अतिक्रमणाबाबत स.सदस्या श्रीमती सुनिता सोनवणे यांनी अनेकवेळा प्रशासनाला पत्रव्यवहार केलेला आहे परंतु प्रशासनाने काहीही कार्यवाही केलेली नाही.

उपअभियंता (न.र.वि.) :नगर रचना विभागामार्फत मार्कआऊट करण्यात आलेले आहे. काम लवकरच चालु होणार आहे.

मा.सभापती :अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही याबाबत प्रशासनाने

योग्य ती कारवाई करण्यात यावी.

**श्री.रेणुकादास वैद्य** :सिडको एन-8 येथील बॉटनिकल गार्डनचे गेल्या पाच वर्षापासून काम झालेले नाही. स.सदस्या श्रीमती प्राजक्ता भाले यांनी काम पुर्ण करण्यासंदर्भात प्रशासनाकडे वारंवार विनंती केली परंतु काहीही उपयोग झालेला नाही. त्यांनी उपोषण करण्याचे पत्र दिलेले आहे. कंत्राटदारास यासंबधी नोटीस इश्यु केली असता नोटीस घेण्यास स्पष्ट नकार देण्यात आला. बॉटनिकल गार्डन डेव्हलपमेंट करण्याकरीता आज पर्यंत 2 कोटी रूपये पाण्यात गेलेले आहे. याबाबतीत प्रशासन गंभिर नाही. बॉटनिकल गार्डन नागरीकांसाठी केव्हा खुले होणार आहे याबाबत माहिती देण्यात यावी.

**मा.सभापती** :खुलासा करण्यात यावा.

**उपअभियंता (श्री.अफसर)**:एन-8 बॉटनिकल गार्डनचे काम अर्धवट अवस्थेत आहे. काम प्रलंबित राहण्याचे कारण म्हणजे पेमेंट वेळेवर न मिळाल्यामुळे काम अर्धवट अवस्थेत राहिलेले आहे.

**श्री.नारायण कुचे** :कोटी रूपये खर्च करून गार्डनची अतिशय वाईट अवस्था झालेली आहे. वर्तमानपत्रामध्ये गार्डनचे फोटो बघीतल्यावर व प्रत्यक्ष पहाणी केल्यावर त्या ठिकाणी गार्डनचे अस्तित्वच लक्षात येत नाही. काम खराब दर्जाचे झालेले आहे. काम न करता बिल अदा करण्यात आलेले आहे.

**उपअभियंता (श्री.अफसर)**: 8 एकर जागेचे कुंपन भिंतीचे काम करण्यात आलेले आहे. प्रशासनाने शेवटची नोटीस अदा करण्यात आलेली आहे. परंतु संबधीताच्या म्हणण्यानुसार पेमेंटचे आश्वासन देण्यात यावे म्हणुन सांगीतले आहे. झालेल्या कामाचे 23 टक्के रक्कम महानगरपालिकेने होल्ड करून ठेवलेले आहे. 16 तारखेस प्रशासन आणि संबधीताची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. यानंतर निर्णय घेण्यात येईल. समितीने निर्णय दिलेला आहे की, 26 टक्के रक्कम टप्प्याटप्प्याने तीन वर्षात देण्यात येईल. कंम्पलिशन नंतरची तीन वर्ष देखरेख स्वखर्चाने संबधीताने करायची होती. अशी अट आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :टप्प्याटप्प्याने रक्कम अदा करण्यात येणार आहे. सन 2006 पासून कंत्राटदाराचे काम चालू आहे. रेट वाढले म्हणण्याचा गुत्तेदाराचा कुठलाही अधिकार नाही. संबधीतामुळे महानगरपालिकेचे दोन कोटी रूपये गार्डनमध्ये व्यर्थ खर्च झालेले आहे. नागरीकांना त्याचा वापर करण्याची संधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे रेट वाढले म्हणुन काम करीत नाही हे म्हणणे संयुक्तीक नाही. संबधीत गुत्तेदाराने सन 2006 पासून काम केलेले नाही व पुढेही काम करण्याची शक्यता दिसुन येत नाही. त्यामुळे सदरील कामाची फेरनिवीदा करून उर्वरित निधी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात येऊन गार्डनचे काम वर्षभरामध्ये पुर्ण करून नागरीकांसाठी खुले करण्यात यावे.

**श्री.नारायण कुचे** :काम पुर्णत्वास करण्यासाठी प्रशासनाने निश्चित दिलेल्या अवधीमध्ये काम करणे आवश्यक होते. काम का करण्यात आले नाही. सन 2012-13चे डिएसआर प्रमाणे काम द्यायचे का? मुदतीत काम न केल्यामुळे प्रशासनाने संबधीताविरूध्द कोणती कारवाई केली.

**उपअभियंता (श्री.अफसर)**:मुदत 12 महिन्यांची होती.

**श्री.मोहन मेघावाले** :संबधीताविरूध्द प्रशासनाने का कारवाई केली नाही.

**श्री.नारायण कुचे** :संबधीताविरूध्द कारवाई झाली पाहिजे.

**उपअभियंता (श्री.अफसर)** :महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्याकारणाने काम न करण्याच्या तत्कालिन आयुक्तांच्या सूचना होत्या. काम करण्यास उशीर झालेला आहे.

**श्री.नारायण कुचे** :नविन डिएसआरनुसार काम दिल्यास महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते. प्रशासनाच्या हलगर्जीमुळे आर्थिक नुकसान होत आहे.

**उपअभियंता (श्री.अफसर)**:समितीने निर्णय दिलेला आहे की, संबधीत गुत्तेदाराकडुनच काम करून घेण्यात यावे संबधीताकडुन काम करून घेतल्यास महानगरपालिकेस ते परवडेल असा निर्णय दिलेला आहे.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :प्रशासन संबधीताला कसा फायदा होईल त्याचे हित जोपासण्याचे काम करीत आहे.

**उपअभियंता (श्री.अफसर)**:16 तारखेच्या बैठकीत निर्णय घेता येईल संबधीताने काम करण्यास नकार दिल्यास त्याचे 40 लाख रूपये मनपाकडे आहे जे जप्त करता येईल.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :संस्थेच्या हिताचे काम प्रशासनाने केले पाहिजे.

**श्री.मोहन मेघावाले** :जे ठेकेदाराला पाठीशी घालीत असेल त्यांचेवर गुन्हा दाखल करण्यात यावा.

**श्री.रेणुकादास वैद्य** :संबधीतास मुदतवाढ दिली त्याची परवानगी कुणाची घेतली. सहा वर्षात संबधीत ठेकेदारावर कुठली कारवाई केली. खुलासा करण्यात यावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :सदरील काम केव्हा मंजूर झाले. तत्कालिन आयुक्तांनी काम केव्हा थांबविण्यास सांगीतले.

**उपअभियंता (श्री.अफसर)**:मे 2008 मध्ये वर्कऑर्डर दिली. एक वर्षानंतर काम थांबविण्याच्या सूचना दिल्यात.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :कामाची मुदत किती वर्षाची होती.

**उपअभियंता (श्री.अफसर)**: एक वर्षाची मुदत होती.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :सभागृहात चुकीची माहिती देण्यात येवु नये.

**श्री.रेणुकादास वैद्य** :गुत्तेदाराचे पहिले देयक अदा केल्याची तारीख 25.08.2007 अशी आहे. प्रशासनाने ॲडव्हान्स पेमेंट केलेले आहे का?

**उपअभियंता (श्री.अफसर)**:वर्क ऑर्डरच्या तारीखेबाबत माहिती घेऊन माहिती देण्यात येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :1 वर्षात काम पुर्ण केलेले नाही. प्रशासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे.

**उपअभियंता (श्री.अफसर)**:दोन वेगवेगळे काम आहेत. नेहरू उद्यान विकसीत करणे व बॉटनिकल गार्डनचे काम दिलेले आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :12 महिने झाल्यानंतर तत्कालिन आयुक्तानी काम थांबविण्याच्या सूचना केल्या होत्या. संबधीताविरूध्द कोणती कारवाई केली.

**उपअभियंता (श्री.अफसर)**:प्रत्येक देयकाच्या 23 टक्के होल्ड करून ठेवलेले आहे. संबधीताच्या म्हणण्यानुसार 11 महिने उशीरा पेमेंट देण्यात आलेले आहे.

**श्री.नारायण कुचे** :महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे यास कोण जबाबदार आहे. जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. कारवाई केली जावी. दंड आकारण्यात यावे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :दिनांक 29.05.2007 पासून दिनांक 28.04.2010 पर्यंत 97 लाख रूपयांचे पेमेंट अदा करण्यात आलेले आहे. दिनांक 12.03.2011 रोजी

21 लाखाचे पेमेंट अदा करण्यात आलेले आहे. प्रशासनाने ठेकेदारांची बाजु घेऊ नये. वेळेत काम पुर्ण केलेले नाही. मुदतवाढीबाबत कुणाचीही परवानगी घेतलेली नाही. तसेच संबधीत गुत्तेदारावर कुठल्याही प्रकारची ॲक्शन घेतलेली नाही. त्यामुळे नियमाप्रमाणे कारवाई होणे अपेक्षित आहे.

श्री.नारायण कुचे :मुदतवाढीबाबत कुणाची परवानगी घेतलेली आहे. वर्षभरात काम का करण्यात आले नाही.

उपअभियंता (श्री.अफसर):तत्कालीन आयुक्तांची मंजूरी घेतलेली आहे.

श्री.नारायण कुचे :केव्हा घेतलेली आहे. दाखविण्यात यावी.

उपअभियंता (श्री.अफसर):संचिका विभागात आहे. विभागातुन संचिका मागविण्यात येऊन थोडयावेळात माहिती देण्यात येईल.

श्री.गिरजाराम हाळनोर :पाण्याचा प्रश्न गंभिर आहे. पाणी प्रश्नासाठी बजेटमध्ये तरतुद करण्यात यावी म्हणुन मागील स्थायी समितीमध्ये आदेश देण्यात आले होते. त्याची अंमलबजावणी प्रशासनाने करावी. शहरात पाणी वाया जाण्याचे प्रमाण जास्त आहे. शहरात लिकेजेस मोठया प्रमाणात आहे. मा.आमदार श्री.सतिश चव्हाण यांनी दुरध्वनीद्वारे त्यांचे भागातील पाणी वाया जात असल्याचे कळविण्यात आले परंतु काहीही कार्यवाही केलेली नाही. शहरात मोठया प्रमाणात लिकेजेस आहे. आहे ते पाणी कसे पुरवायाचे याचे नियोजन करीत आहे. पाण्याचे नियोजन योग्य पध्दतीने करणार आहे की, नाही.

श्री.बाळासाहेब मुंडे :शहरातील लिकेजेस मोठया प्रमाणात आहे. लिकेजेस काढण्याकरीता अपुरे कर्मचारी असल्याचे सांगीतले जाते.

श्री.समीर राजुरकर :एमएन्डआर (देखभाल व दुरूस्ती)चे बिल सादर केले जातात. स्थायी समितीने एमएन्डआरचे कामे थांबविण्याचे आदेश दिल्यास एमएन्डआरचे कामे करण्यात येणार नाही , लिकेजेस काढण्यात येणार नाही म्हणुन सांगीतले जाते. एखादया भागातील लिकेजेस काढल्यास ते सहा महिने तरी टिकले जावे परंतु असे होत नाही. 10 तक्रारी पैकी किती काम कोणत्या गुत्तेदारामार्फत केले आहे याची माहिती ठेवण्यात यावी. ग्रामीण भागात व शहरातील काही भागात पाण्याची अतिशय गंभिर परिस्थिती आहे. परंतु वाया जाणाऱ्या पाण्यावर, लिकेजेसवर प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

मा.सभापती :स.सदस्यांनी मांडलेले मुद्दे अतिशय महत्वाचे आहे. शहरातील वाया जाणारे पाणी व लिकेजेस तातडीने बंद करण्यात यावे.

श्री.समीर राजुरकर :हर्सुल तलावातील मासेमारीचा ठेका दिनांक 01.04.2012 रोजी ई-टेंडरींगद्वारे श्री.समीत प्रमोद चौधरी यांना दिला होता ठेका दिनांक 31.03.2015 पर्यंतचा होता. अनामत रक्कम म्हणून 4.50 लाख रूपये महानगरपालिकेकडे जमा करण्यात आलेले आहे. मा.आयुक्त यांना श्री.समीत चौधरी यांनी सुट मिळण्याकरीता विनंती केलेली आहे. हर्सुल तलाव पुर्णपणे आटल्यामुळे सहा ते नऊ महिन्यांपर्यंत मासेमारी होऊ शकणार नाही. दुष्काळग्रस्त परिस्थिती असल्याने व शासन निर्णयानुसार यावर्षी वार्षिक ठेक्यामध्ये सुट देण्यात यावी. पाणी आटल्यामुळे मासेमारी हर्सुल तलावात होऊ शकत नाही. त्यामुळे यावर्षीच्या ठेक्यामध्ये सुट देण्यात यावी.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

पशुसंवर्धन अधिकारी :तीन तलाव मासेमारीसाठी ठेक्याने दिलेले आहे. मागील वर्षी या तीन तलावाचे अनामत आणि हप्त्ये मिळुन 8 लाख 65 हजार रूपये महानगरपालिकेत जमा झाले होते. सलिम अली सरोवर येथील वार्षिक ठेका 15 हजाराचा होता व दरवर्षी 10 टक्के वाढ भरणा करायची होती, परंतु संबंधीताने ती रक्कम न भरता नुकसान झाले खाद्य टाकलेले आहे. परंतु उत्पन्न प्राप्त झालेले नाही म्हणुन मा.न्यायालयात 50 लाखांचा दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे करारामध्ये अटी शर्तीमध्ये बदल करून ठेक्याची रक्कम आणि कालावधी या संदर्भांत कडक अटी करण्यात आल्या आहेत पाऊस नसल्यामुळे श्री.समीत प्रमोद चौधरी यांनी लेखी अर्ज दिलेला आहे. सभागृहाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.समीर राजुरकर :शासन निर्णयात स्पष्ट नमुद केलेले आहे.

पशुसंवर्धन अधिकारी :दुष्काळग्रस्त परिस्थिती असल्याने व तलाव आटल्याने रिलिफ देण्यास काही हरकत नाही.

मा.सभापती :दुष्काळग्रस्त परिस्थिती आहे,तलाव आटलेला आहे. सुट देण्यास मंजूरी देण्यात येते. एक वर्षासाठी सुट देण्यात यावी. याबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

श्री.मोहन मेघावाले :सलिम अली सरोवर तलाव आटलेला आहे. संबधीत ठेकेदारासही न्याय देण्यात यावा. संबधीताने अर्ज दिलेला आहे.

मा.सभापती :स्थायी समितीसमोर अपिल/पत्र देण्यात यावे. स्थायी समिती निर्णय घेईल.

श्रीमती प्राजक्ता राजपुत:पोलीस आयुक्तांनी होर्डींगबाबत केलेल्या कारवाई अभिनंदनीय आहे. मोठमोठे जे होर्डींग लावलेले आहे त्या इमारतींना व्यावसायिक टॅक्स लावण्यात आलेला आहे का? महानगरपालिकेची परवानगी देण्यात आलेली आहे का?या बाबत माहिती देण्यात यावी. तसेच एखादी दुर्देवी घटना घडल्यास इमारत मालक, लावण्यात आलेले होर्डींगधारक, की, महापालिका त्या घटनेला जबाबदार असणार आहे. खुलासा करण्यात यावा.

श्री.बाळासाहेब मुंडे :शहरात अधिकृत व अनाधिकृत होर्डींग किती लावण्यात आलेल्या आहेत खुलासा करण्यात यावा.

श्री.समीर राजुरकर :शहरात अनाधिकृत होर्डींग किती, महानगरपालिकेने होर्डींगकरीता निश्चित केलेल्या ठिकाणे किती व कोणती यासर्व बाबीची माहिती देण्यात यावी. महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा विषय आहे. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पोलीस प्रशासनाने एका दिवसात सर्व होर्डींग काढण्यात आल्या. महानगरपालिका प्रशासन कार्यवाही का करत नाही. वेळोवेळी प्रशासनाने अनाधिकृत होर्डींगबाबत कारवाई करण्यासंबधी सूचना देण्यात याव्यात. होर्डींगबाबत महानगरपालिकेने नियमावली तयार केलेली आहे का?

श्री.रेणुकादास वैद्य :होर्डींगधारकानां शहरात मनपाने परवानगी दिलेल्या होर्डींगचे ठिकाणाची माहिती देणे आवश्यक आहे. त्याशिवाय इतर होर्डींगवर कारवाई केली जाईल म्हणुन माहिती देणे आवश्यक आहे. तसेच होर्डींग दर हे दहा वर्षापुर्वी जुने रेट आहे याबाबत प्रशासनाने योग्य नियोजन करणे आवश्यक आहे.

मा.सभापती : होर्डींगबाबत नियोजन करून दर वाढविणेबाबत कार्यवाही करणे, अधिकृत,अनाधिकृत होर्डींगची माहिती देणे, अनाधिकृत होर्डींग तातडीने

काढणे बाबत नियमित कारवाई चालू ठेवण्यात यावी.

मालमत्ता अधिकारी :346 अधिकृत होर्डींगला महानगरपालिकेने परवानगी दिलेली आहे. एखादी दुर्देवी घटना घडल्यास जाहिरात उभारण्यावर सर्वस्वी जबाबदारी असते. होर्डींग लावलेल्या इमारतींना कर्मिशिअल टॅक्स लावला गेला पाहिजे सदरील प्रश्न हा टॅक्स विभागाशी संबधी आहे. होर्डींगला टॅक्स आकारणी केली जाते. होर्डींगबाबत जाहिराती फलकबाबत नियमावलीनुसारच सर्व कार्यवाही करण्यात येते.

मा.सभापती :346 होर्डींगला परवानगी देतांना प्रशासनाने काय बघीतले. दर कुठले लावले जाते.

मालमत्ता अधिकारी :इमारतीचे बांधकाम परवानगी, बेबाकी प्रमाणपत्र व इतर बाबी तपासून होर्डींगसाठी परवानगी देण्यात येते. वेगवेगळया लोकेशननुसार दर आकारणी केली जाते. सन 2003 च्या ठरावानुसार ठरलेले दर आहेत त्यानुसार दर आकारणी केली जाते.

मा.सभापती :महानगरपालिकेच्या हिताचा विचार करता प्रशासनाने नविन दर आकारण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

मालमत्ता अधिकारी :क्रीसील या संस्थेकडुन प्रोजेक्ट तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

मा.सभापती :नियमित अनाधिकृत होर्डींग काढण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

श्री.विजेंद्र जाधव :अनाधिकृत होर्डींगविरोधात पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात यावा. दंड आकारणी करण्यात यावी.

श्री.बाळासाहेब मुंडे :अनाधिकृत होर्डींगची संख्या मोठया प्रमाणात आहे. कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती :सन 2003चे दर आकारणी केली जाते. दर वाढविणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करण्यात यावे. तसेच अधिकृत अनाधिकृत होर्डींग किती याबाबतची माहिती पुढील स्थायी समितीपुर्वी देण्यात यावी. मुंबई महानगरपालिका व इतर महापालिका होर्डींगद्वारे उत्पन्न जास्त प्रमाणात आहे. शहरात सगळयाच ठिकाणी होर्डींग लावण्यासंदर्भात एकच रेट लावण्यात यावा.

श्री.समीर राजुरकर : कलम 45(7)ची तरतुदबाबत माहिती देण्यात यावी.

नगर सचिव :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949चे कलम 45 (7) नुसार पोट-कलम (1) किंवा पोट-कलम (5) अन्वये नेमणुकीची व्यवस्था होईपर्यंत, महानगरपालिकेस एखाद्या व्यक्तीची नेमणूक करून ती जागा तात्पुरती भरता येईल आणि अशा रीतीने नेमणूक केलेल्या व्यक्तीला पोट-
कलम (3) अन्वये त्या वेळी निश्चित केलेल्या कमाल मर्यादेहून अधिक नसेल इतके महानगरपालिकेस योग्य वाटेल असे मासिक वेतन व भत्ते मिळतील असा नि निर्देश देता येईल, परंतु, अशी कोणतीही नेमणूक, ज्या तारखेस ती जागा रिकामी झाली असेल त्या तारखेपासून सहा महिन्यांहून अधिक मुदतीसाठी करता येणार नाही किंवा ती अशा तारखेपासून सहा महिने इ
ाल्यानंतर करता येणार नाही.

श्री.समीर राजुरकर :नियमानुसार ॲक्टनुसार सहा महिने पुर्ण झालेले आहे याबाबतीत संबधीतांना पत्राने कळविलेले आहे का?

आस्थापना अधिकारी-1 :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949चे कलम 45 अन्वये संवेधानिक जी पदे आहेत. त्यासंदर्भात आहे. सहा महिनेपेक्षा जास्त

कालावधीसाठी अतिरीक्त पदभार देता येत नाही. आस्थापना अधिकारी-1 यांचेकडे उपआयुक्त महसूल या पदाचा अतिरीक्त कार्यभार होता तो 31 ऑगस्ट 2012 ते 28.02.2013 रोजी सहा महिन्यांचा कालावधी पुर्ण झालेला आहे. संचिका पुटअप करून पदभार काढण्याबाबत विनंती केली होती त्यानुसार पदभार काढण्यात आलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :वैयक्तिक माहिती देण्यात येऊ नये. महानगरपालिकाबाबत माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :सहा महिन्याचा अतिरिक्त पदभार किती अधिकाऱ्यांना देण्यात आलेला आहे.

आस्थापना अधिकारी-1 :आरोग्य वैद्यकीय अधिकारी, उपआयुक्त सिडको, डॉ.देवगांवकर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर होते सन 2011 रोजी नाशिक येथे त्यांची पदोन्नतीद्वारे बदली झालेली आहे. सन 2011 रोजी डॉ.जयश्री कुलकर्णी यांचेकडे चार्ज देण्यात आला होता. मध्यंतरी मा.महापौरांशी असभ्य वर्तन केल्यामुळे सदर पदाचा चार्ज काढण्यात आला होता. त्यानंतर 31 ऑगस्ट 2012 रोजी आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाचा चार्ज देण्यात आलेला आहे. चार्ज देऊन सहा महिने झालेले आहे.

श्री.समीर राजुरकर :आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सहा महिने पुर्ण झाल्याबाबत प्रशासनातर्फे पत्र देण्यात आलेले आहे का?

आस्थापना अधिकारी-1 :पत्र देण्यात आलेले नाही.

श्री.समीर राजुरकर :पत्र का देण्यात आले नाही?

आस्थापना अधिकारी-1 :पुटअप करण्यात आले आहे.

श्री.समीर राजुरकर :मुदत संपण्यापुर्वी पत्र देणे अपेक्षित होते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे 45 (7) ची पायमल्ली होऊ नये. 45(7) अन्वये कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती :स.सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यानुसार व प्रशासनाने केलेल्या खुलाश्यानुसार प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी.

श्री.समीर राजुरकर :नियमाप्रमाणे 45(7) प्रमाणे कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती :45(7) प्रमाणे कारवाई करण्यात यावी.

श्री.बाळासाहेब मुंडे :औषध फवारणीचे टेंडर देण्यात आली आहे. त्याच लोकांना टेंडर देण्यात येते. कुठल्या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात आलेली आहे माहिती देण्यात यावी.

श्री.समीर राजुरकर :84 लाख फवारणीसाठी खर्च करण्यात येत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :जो प्रश्न उपस्थित केला आहे अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. एका प्रभागासाठी 84 लाख खर्च करीत आहे. याची निवीदा प्रक्रीया कशा पध्दतीने झाली याचा खुलास करण्यात यावा.

श्री.बाळासाहेब मुंडे :टेंडर थांबविण्यात यावे.

मा.सभापती :विभाग प्रमुख सभेला हजर नाही. सदरील विषयावर सविस्तर चर्चा होत नाही तो पर्यंत निवीदेला स्थगीती देण्यात येते.

श्री.गिरजाराम हाळनोर :गणेश उत्सवादरम्यान रस्ते पॅचवर्ककरीता वर्षभरासाठी टेंडर काढण्यात आले होते. परंतु शहरात आजही मोठमोठे खड्डे पडलेले आहे. तसेच माझ्या प्रभागातील रस्त्याचे पॅचवर्क करण्यात आलेले नाही. रस्त्याची वाईट अवस्था झालेली आहे. रस्त्याचे पॅचवर्क तातडीने करण्यात यावे.

| | |
|---|---|
| **शहर अभियंता** | **:दशमेश नगर येथील रस्ता डिफर पेमेंटमध्ये घेतलेला आहे. वॉटर लाईन मुळे रस्त्याला विलंब झालेला आहे. लाईन शिफ्ट करण्याचे काम लवकरच करण्यात येईल. पॅचवर्कचे काम लवकरच करण्यात येईल.** |
| **मा.सभापती** | **:मार्चच्या शेवटच्या आठवडयापर्यंत ज्या ज्या वार्डात पॅचवर्कची आवश्यकता आहे तिथे पॅचवर्क करण्यात यावी. तसेच पॅचवर्कचे काम कुठे कुठे झाली याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.** |
| **श्री.नारायण कुचे** | **:रेल्वेस्टेशन मुकूंदवाडी रोड सहा महिन्यात रोड वाईंडींगमध्ये जाणारा भाग काढण्यात येऊन ताब्यात घेण्यात येईल म्हणुन मा.न्यायालयात तत्कालिन आयुक्तांनी शपथपत्र दिले होते. माहिती देण्यात यावी.** |
| **सहा.संचालक न.र.** | **:सदरील रस्ता हा सिडको डिनोटीफाईड एरीया असल्यामुळे मनपाकडे त्याची कुठलिही मार्कींग नाही. सिडकोचा त्यावेळी तिथे डिपी होता त्यावेळेला तो 24 मिटरचा रस्ता होता. परंतु सिडकोने डिनोटीफाईड केल्यामुळे डिपी रद्द झालेला आहे. संबधीत पिटीशनरनी मा.न्यायालयात पिटीशन दाखल केले होते. त्यावेळी मा.न्यायालयाने मार्कींग करीता इतर प्रक्रीयेकरीता किती वेळ लागेल म्हणुन विचाराणा केली होती. त्यावेळेस साधारणतः जॉईन्ट मेजरमेंट दोन महिण्यांमध्ये लॅन्ड रेकॉर्ड कडुन घेण्यात येईल त्या नंतर अतिक्रमण काढुन रस्ता बांधण्यात येईल याकरीता सहा महिन्यांची मुदत लागेल असे सांगण्यात आले. टिएलआर, जिल्हाधिकारी यांना स्मरणपत्र देण्यात आलेले आहे. तीन महिन्यांचा कालावधी झ ालेला आहे. संबधीत विभागाला आदेशित करून मोजणी करून देण्याबाबत मा.न्यायालयाला विनंती करण्यात येईल.** |
| **श्री.गिरजाराम हाळनोर** | **:डिपी प्लॅन एकदा मंजूर झाल्यानंतर सिडकोने नोटीफाईड केल्यानंतर डिपी प्लॅन चेंज होतो का?** |
| **सहा.संचालक न.र.** | **:एकदा डिपी प्लॅन मंजूर झाल्यानंतर डिनोटीफाईड करायचा महानगरपालिकेला प्रश्न येत नाही. सिडकोने त्यांचा प्लॅन त्यावेळेला तयार केला होता तेव्हा त्यांनी त्यांचा डिपी प्लॅन तयार केला होता परंतु त्यांनी तो एरिया त्यांच्या डिपी प्लॅनमधुन वगळण्याची कार्यवाही केली. वगळल्यामुळे तो डिनोटीफाय झाला. त्यामुळे तेथील प्लॅन रद्द झाला व रस्ताही तीथे राहिलेला नाही. रस्ता राहिलेला नसल्यामुळे महानगरपालिकेला मेजरमेंट कशा प्रकारचे आहे हे सांगता येत नाही. म्हणुन लॅन्ड रेकॉर्डला मेजरमेंट करा म्हणुन कळविलेले आहे. मेजरमेंट झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.** |
| **श्री.नारायण कुचे** | **:ज्या रोडवर गुंठेवारीच्या संचिका आलेल्या आहेत ते का करण्यात येत नाही. प्रशासनाने लेखी द्यावे तेथील सर्व घरे नियमित करून देण्यात यावी.** |
| **शहर अभियंता** | **: सिडकोने त्यांचा प्लॅन त्यावेळेला तयार केला होता तेव्हा त्यांनी त्यांचा डिपी प्लॅन तयार केला होता परंतु त्यांनी तो एरिया त्यांच्या डिपी प्लॅनमधुन वगळण्याची कार्यवाही केली. वगळल्यामुळे तो डिनोटीफाय झाला. रस्ता हा डिपी राहिलेला नाही. सदरील रस्त्यासाठी मा.न्यायालयात पिटीशन दाखल झ ालेले आहे. त्यानुसार मा.न्यायालयाने महानगरपालिकेस निर्देश दिलेले आहे.** |
| **सहा.संचालक न.र.** | **: टिएलआर, जिल्हाधिकारी यांना स्मरणपत्र देण्यात आलेले आहे. तीन महिन्यांचा कालावधी झालेला आहे. संबधीत विभागाला आदेशित करून** |

मोजनी करून देण्याबाबत मा.न्यायालयाला विनंती करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद ही लोक हितोपयोगी संस्था 1966 पासुन शहरात कार्यरत असुन या संस्थेने ना नफा ना तोटा धर्तीवर क्रांतीचौक भागात ब्लड बँक सुरू करण्याचे ठरविले आहे. महानगरपालिकेने मा.सर्वसाधारण सभेमध्ये 5 लाख रूपयांचे आर्थिक सहाय्य करण्याचे आदेश दिले होते. परंतु महानगरपालिकेची आर्थीक परिस्थिती बरोबर नसल्याकारणाने 2 लाख रूपयांची आर्थीक मदत देण्यात आली. आर्थीक परिस्थिती बरोबर नसल्याकारणाने 3 लाख रूपयांची मदत देऊ शकलेलो नाही. मनपाचे 2 लाख रूपयांची केलेल्या मदतीकरीता संस्थेने धन्यवाद केलेले आहे. तसेच लायन्स क्लबने विनंती केलेली आहे की, शहरात येणाऱ्या ब्लडबँकेसाठीच्या साहित्याकरीता साधारणतः दिड लाख रूपये एल.बी.टी. लागणार आहे. त्यात सुट देण्यात यावी म्हणुन विनंती अर्ज दाखल केलेला आहे.ब्लड बँकेच्या मशनिरीपुरती एल.बी.टी.माफी देण्यात यावी.

मा.सभापती :मा.सर्वसाधारण सभेमध्ये 5 लाख रूपयांचे आर्थिक सहाय्य करण्याचे आदेश दिले होते. परंतु महानगरपालिकेची आर्थीक परिस्थिती बरोबर नसल्यामुळे 2 लाख रूपयांचीच आर्थीक मदत देण्यात आली आहे. लोकहितासाठी सदरील संस्था कार्य करीत आहे. ब्लड बँकेस लागणाऱ्या मशिनरीची आयात करणार असुन या आयात मशिनरीवर एल.बी.टी. माफी देणे संदर्भात नियम 28.6 च्या विवक्षीत प्रकरणात कर माफीच्या नियमाप्रमाणे एल.बी.टी. करातून सुट देण्यात यावी. लायन्स क्लब शहरात ब्लड बँक सुरू करत असल्याकारणाने त्याचे अभिनंदन करण्यात येते तसेच महानगरपालिकेचे सहकार्य म्हणुन एल.बी.टी.मध्ये सुट देण्यात यावी.

श्री.समीर राजुरकर :सलीम अली सरोवर येथील कामाबाबत माहिती देण्यात यावी.

कार्य.अभियंता (बिओटी) :सलीमअली सरोवर येथील मेन गेटचे आणि पिल्लरचे काम लवकरच सुरू होणार आहे.

**श्री.मोहन मेघावाले** :सलीम अली सरोवर येथील विषयाबाबत मा.सभापती तसेच इतर स.सदस्यांनी या विषयासंदर्भात वेळोवेळी चर्चा केलेली आहे. कामास विलंब लावत असल्यामुळे संबधीत ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी. सदरील कामासाठी उपोषन करण्याची वेळ आल्यास ती करण्यात येईल.

**मा.सभापती** :काम का बंद आहे खुलासा करण्यात यावा.

**कार्य.अभियंता (बिओटी)** :पेमेंटस् न मिळाल्यामुळे कामास विलंब झालेला आहे. मोजणीचे काम तात्काळ करण्यात येणार आहे. काम केले नाही तर संबधीतावर नियमानुसार नोटीस देऊन योग्य ती कारवाई करण्यात येईल.

**श्री.समीर राजुरकर** :वार्ड क्रमांक 53 येथे टाकळकर सोसायटी असुन या सोसायटीने सोसायटीच्या अंतर्गत वापरकरण्याकरीता हॉलचे बांधकाम केलेले आहे. त्यास अनेक वर्षापासून व्यवसायिक कर लावण्यात आलेला आहे. सन 1997 पासून सोसायटीने महानगरपालिकेस पत्रव्यवहार केलेला आहे की, सदरील हॉल हा सार्वजनिक हॉल असून तो सोसायटीच्या/कॉलनीच्या वापराकरीता आहे. त्यास व्यवसायिक कर लावण्यात येऊ नये. परंतु याबाबतीत प्रशासनाकडुन कुठलीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे टॅक्स वाढत चालला आहे. सदरील हॉलला रेसिडेन्शीएल टॅक्स लावण्यात यावे.

**मा.सभापती** :स.सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार सदरील हॉल हा कॉलनीच्या अंतर्गत वापराकरीता असुन व्यवसायिक वापर करण्याकरीता नाही. कॉलनीतील सार्वजनिक वापर करण्याकरीता हॉल आहे याबाबतीत प्रशासनाने हॉलला रेसिडेन्शीएल टॅक्स लावण्याचा योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

**विषय क्र. 180 :** (विषय क्र. 176 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 06/03/2013 (का.प.क्र.29) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** : विषय मंजूर.

**ठराव :**

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.**

**विषय क्र. 181 :** (विषय क्र. 177 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 06/03/2013 (का.प.क्र.29) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

**दिनांक 27/07/2012 (का.प.क्र.7),03/08/2012 (का.प.क्र.8),10/08/2012 (का.प.क्र.9), 21/08/2012 (का.प.क्र.10), 28/08/2012 (दि.21/08/2012 ची तहकुब सभा) (का.प.क्र.10), 28/08/2012 (का.प.क्र.11) व 07/09/2012 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**ठराव :**

**दिनांक 27/07/2012 (का.प.क्र.7),03/08/2012 (का.प.क्र.8),10/08/2012 (का.प.क्र.9), 21/08/2012 (का.प.क्र.10), 28/08/2012 (दि.21/08/2012 ची तहकुब सभा) (का.प.क्र.10), 28/08/2012 (का.प.क्र.11) व 07/09/2012 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.**

**विषय क्र. 182 :**

**दिनांक 21/09/2012 (का.प.क्र.13) व दिनांक 28/09/2012 (का.प.क्र.14) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

**श्री.समीर राजुरकर :विषय क्रमांक 182 मंजूर करत असतांना दिनांक 21.09.2012 कार्यक्रम पत्रिका क्रमांक 13 च्या सभेत आयुक्त तथा उपआयुक्त प्रशासन यांनी नगर सचिव विभागात कार्यरत कर्मचारी श्री.मनोज मारवाडे हे स्टेनोचे काम करीत असुन अतिरिक्त कार्यभार संभाळत असलेल्या कर्मचाऱ्यास फुलटाईम स्टेनोचेच पदनाम देवुन काम देण्यात यावे जेणेकरून इतिवृत्त तयार होण्यास विलंब होणार नाही. मा.आयुक्तांनी सभेला आश्वासन देवुन कित्येक महिने झालेले आहे. सदरील कर्मचारी गेल्या पाच वर्षापासून स्टेनोचे काम करीत आहे. महानगरपालिकेच्या सर्व नियमावलीत बसतात. प्रशासनाने तात्काळ स्टेनोचे पदनाम देण्यात येईल म्हणुन सांगीतले होते परंतु अद्यापपर्यंत त्याची अंमलबजावणी झालेली नाही. श्री.मनोज मारवाडे यांना स्टेनोचे पदनाम दिल्यास मनपावर आर्थीक बोजा पडणार नाही. इतिवृत्त वेळेवर मिळतील जबाबदारी निश्चित होईल.**

**प्र.आयुक्त तथा शहर अभियंता: श्री.मनोज मारवाडे, प्र.लघुलेखक तथा कनिष्ठ लिपीक यांचा प्रश्न तात्काळ सोडविण्यात येईल.**

**श्री.रेणुकादास वैद्य :स्टेनोचे काम गेल्या पाच वर्षापासून करत आहे. याचा प्रशासनाने विचार करून स्टेनोचे पदनाम देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.**

**मा.सभापती :स्थायी समितीची जबाबदारी आहे. सदरील काम अतिशय जबाबदारीचे आहे याचा प्रशासनाने विचार करावा स्टेनोग्राफरचे पदनाम दिल्यास काम नियमाने होईल श्री.मनोज मारवाडे यांची जबाबदारी निश्चित होईल. इतिवृत्तामध्ये शब्दांचा बदल झाल्यास त्याची जबाबदारी कुणावर निश्चित होईल नियमाने याची जबाबदारी सभागृहावर येईल. श्री.मनोज मारवाडे, प्र.लघुलेखक यांना स्टेनोग्राफरचे पदनाम देऊन स्टेनोग्राफरची वेतनश्रेणी देणेबाबत त्वरीत देणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.**

**श्री.समीर राजुरकर :प्र.आयुक्त यांनी दिनांक 21.09.2013 रोजीच्या सभेत ज्या प्रमाणे आश्वासन दिले व ते प्रलंबित राहिलेले आहे तसे यावेळेस होऊ नये प्रशासनाने गांभिर्याने सदरील कर्मचाऱ्याचा (श्री.मनोज मारवाडे) प्रश्न सोडविण्याविषयी कार्यवाही करावी. इतिवृत्त वेळेवर मिळेल याबाबतीत प्रशासनाने कार्यवाही करावी. किती दिवसात याचा निर्णय होईल या संबधी ठोस निर्णय घेण्यात यावा.**

**मा.सभापती : विषय क्रमांक 182 मंजूर.**

**ठराव :**

**दिनांक 21/09/2012 (का.प.क्र.13) व दिनांक 28/09/2012 (का.प.क्र.14) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.**

**विषय क्र. 183 :** **(विषय क्र. 174 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 28/02/2013 (का.प.क्र.28) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)**

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की, UIDSSMT अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेने केंद्र शासनासोबत MoU (करारनामा) केलेला असून Reforms राबविणे महानगरपालिकेवर बंधनकारक आहे. याकरीता Reforms and MoA Monitoring and Implementation Assistance करीता यापूर्वी जुन 2010 मध्ये विहीत पद्धतीचा अवलंब करुन निविदा कार्यवाही करण्यात आली होती. या प्रकल्पास साधारणत: चार ते पाच वर्ष लागणार असे अपेक्षित असल्याने निविदा कार्यवाही करतांना**

**Request for Proposal (RFP) मध्ये Clause 1.3 Time frame -"The contract for providing Reforms and MoA Implementation and Monitoring Assistance shall be initially for an intial period of one year and there after extendible with mutual agreement" असे नमुद आहे. तसेच Clause 3 - "The agency should quote the financial offer in terms of monthly fees including all taxes. The offer will be for a period of one year which may be extended subject to satisfactory performance for further period with mutual agreement" असे नमुद आहे.**

**या प्रकरणी ई टेन्डरद्वारे क्रिसील रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर्स सोल्युशन्स लिमीटेडची नियुक्ती करण्यात आली आहे. क्रिसील संस्थेसोबत करण्यात आलेल्या Agreement मध्ये Clause -1 मध्ये "The Duration of the Agreement is for a period of 12 months from the date of the commencement of the assignment, i.e. from June 1st 2011 (Commencement Date ) upto May 31st, 2012 which may be entended subject to satisfactory performance for further period with mutual agreement" असे नमुद आहे. या प्रकरणी क्रिसील संस्थेला पहिल्या वेळेस तिन महिन्याचा व त्यानंतर चार महिन्याचा कालावधी वाढवुन दिलेला असून हा वाढीव कालावधी दिनांक 31.12. 2012 रोजी संपलेला आहे.**

**क्रिसील संस्थेने त्यांच्या उपरोक्त कालावधीमध्ये समाधानकारक काम केले आहे. या अंतर्गत Property Tax, Double Entry Accounting System, E- Governance, User Charges, Adminstrative Reforms व इतर Reforms राबविण्याची कामे सुरु आहेत. औरंगाबाद महानगरपालिकेने केंद्र शासनासोबत केलेल्या करारनाम्यानुसार प्रत्येक टप्प्यावर Status of Reforms committed under MoA Agreement ची सांगड घालुन Reforms ची कामे सुरु आहेत. तथापि महानगरपालिकेतील Reforms ची कामे अद्यापही पूर्ण झालेली नाहीत.**

**क्रिसील संस्थेने दिनांक 15.12.2012 रोजी पत्र दिले असून निविदा अटी व शर्ती नुसार त्यांच्या कामाचा कालावधी पुढील एक वर्षाकरीता वाढवुन मिळणेबाबत विनंती केली आहे. सदर पत्रामध्ये क्रिसील संस्था सद्या मुळ निविदेनुसार करीत असलेल्या कार्यव्याप्ती व्यतिरिक्त इतर कामेही करण्यास तयार असून सविस्तर माहिती पत्रामध्ये नमुद केलेली आहे.**

**क्रिसील संस्था सद्या करीत असलेली कामे खालीलप्रमाणे आहेत.**

1. **Reforms implementation assistance**
2. **JNNURM / UIDSSMT support assistance**
3. **Project implementation assistance on the water PPP project**

**या व्यतिरिक्त क्रिसील संस्था पुढील कालावधीमध्ये खालील कामे करण्यास तयार आहे.**

1. **<u>Clousure Of Revised City Development Plan (CDP)</u> - औरंगाबाद महानगरपालिकेने इतर संस्थेकडुन शहर विकास आराखडा (CDP) तयार केलेला असून सदर आराखडा हा केंद्र शासनाच्या भविष्यात येणाऱ्या JNNURM - II व इतर योजनांसाठी आवश्यक असलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार सुधारीत करण्याचे काम उपरोक्त कामांसोबत व निविदेतील मंजुर दराने क्रिसील संस्था करण्यास तयार असून सध्या हे काम क्रिसील संस्थेने सुरु केले आहे.**
2. **<u>Transaction advisory services for developing Public Private Partnership (ppp) framework -</u> औरंगाबाद महानगरपालिकेचा विविध सेवांवर होणारा खर्च कमी करुन महसूल वाढविण्याच्या दृष्टीने विविध प्रकल्प पीपीपी तत्वावर राबविता येतील असे क्रिसील संस्थेचे मत आहे. या अंतर्गत Land Development, projects based on advertisement rights, energy saving for street lights, outsourcing contracts for SWM collection, transportation, treatment and desposal इत्यादी प्रकल्पांचा समावेश होऊ शकतो. सदर प्रकल्प पीपीपी तत्वावर राबविण्यासाठी**

आवश्यकतेनुसार RFP ची निविदा कार्यवाही करणे, पीपीपी ऑपरेटर अंतिम करणे, कन्सेशन ॲग्रीमेंट करणे इत्यादी कार्यवाही क्रिसील संस्था करण्यास तयार आहे. तथापि, असे पीपीपी प्रकल्प जर यशस्वी ठरुन महानगरपालिकेतर्फे पीपीपी ऑपरेटरची नियुक्ती करण्यासाठी LoA देण्यात आले तर अशा परिस्थितीमध्ये क्रिसील संस्था Success Fees म्हणून शुल्क आकारेल. सदर Success Fees बाबत संबंधीतांनी पत्रामध्ये पुढीलप्रमाणे नमुद केले आहे. "We will be pleased to offer you success fees of Rs. 10 Lakhs plus sevice tax for the first land development project and thereafter Rs. 5 Lakhs plus service tax per land development project. In the case of service oriented projects covering energy saving, advertisement etc we will take a success fee Rs. 10 Lakhs plus service tax per project. In the case of PPP project involving services like SWM the success fees will be far higher and can be mutually agreed upon if the same is to be done by us."

3. औरंगाबाद महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प पीपीपी तत्वावर राबविण्याचे नियोजन असून क्रिसील संस्थेने या प्रकल्पासाठी काम सुरु केले आहे. या प्रकल्पासाठी RFP Document तयार करण्याचे काम सुरु असून याप्रकल्पाशी संबंधीत अधिकारी उदा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, सर्व वार्ड अधिकारी व उप अभियंता यांत्रिकी यांच्या सोबत वेळोवेळी बैठका होऊन निविदा दस्तावेज परीपुर्ण होण्यासाठी विविध बाबींवर सविस्तर चर्चा झाली आहे. या प्रकल्पाकरीता क्रिसील संस्थेचे काम सुरु आहे.
4. औरंगाबाद महानगरपालिकेचा रुपये 394.70 कोटी रक्कमेच्या जलनिःस्सारण प्रकल्पास केंद्र शासनाच्या UIDSSMT अंतर्गत मान्यता झालेली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने शासनासोबत MoA केलेले आहे. या प्रकल्पास व JNNURM - II मधील प्रकल्पांना Contractual Advisory Support म्हणून क्रिसील संस्था काम करणार असल्याचे त्यांनी त्यांच्या सुधारीत offer मध्ये कळविले आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी विविध टप्प्यांवर क्रिसील संस्थेची मदत होणार आहे.

दिनांक 11.12.2012 रोजी पीपीपी प्रकल्पांसंदर्भाने मा.सचिव, डिपार्टमेंट ऑफ इकॉनोमिक अफेअर्स, वित्त मंत्रालय, दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली दिल्ली येथे आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीस औरंगाबाद महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा हे उपस्थित होते. औरंगाबाद शहराच्या समांतर जलवाहिनीचा पीपीपी प्रकल्प हा IIPDF योजनेतुन PPP Mode वर विकसीत करण्यात आला असून हा पथदर्शी प्रकल्प असून संपुर्ण देशभरातुन Source to Tap पर्यंतचा पहिलाच मोठा प्रकल्प असल्याने या प्रकल्पाच्या यशस्वितेकडे केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालय, नागरी विकास विभाग आणि राज्य शासनाचे नगर विकास विभाग व पीपीपी सेल चे विशेष लक्ष असल्याबाबत बैठकीत चर्चा झाली.

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT अंतर्गत समांतर जलवाहिनी योजनेचा प्रकल्प पीपीपी तत्वावर राबविण्यात येत आहे. मुळ JNNURM / UIDSSMT योजनेचा कालावधी दिनांक 31.03.2012 रोजी संपलेला असून केंद्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना बंधनकारक केलेले विविध Reforms पुर्ण करण्यासाठी आणि सध्या सुरु असलेल्या मंजुर प्रकल्पांची कामे पुर्ण करण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी म्हणजेच मार्च 2014 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. UIDSSMT योजने अंतर्गत केंद्र शासनाने त्यांच्या अनुज्ञेय अनुदानापैकी 50% रकमेचा पहिला हप्ता रुपये 143.87 कोटी रक्कम दिनांक 03.11.2009 रोजी व राज्य शासनाने त्यांच्या अनुज्ञेय अनुदानापैकी 50% रकमेचा पहिला हप्ता रुपये 17.94 कोटी रक्कम दिनांक 04.05.2011 रोजी औरंगाबाद महानगरपालिकेस वितरीत केलेला आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने Reforms राबविण्यासंदर्भाने केंद्र शासनासोबत UIDSSMT अंतर्गत करारनामा

(MoA) केलेले असून सदर Reforms राबविणे औरंगाबाद महानगरपालिकेस बंधनकारक आहे. त्यामुळे महानगरपालिकेने Reforms राबविल्याशिवाय अनुज्ञेय अनुदानाच्या उर्वरित दुसऱ्या हप्त्याची रक्कम मिळणार नाही. परिणामी समांतर जलवाहिनीच्या प्रकल्पास विलंब होऊ शकतो.

केंद्र शासनाच्या नियोजन विभागाचे दिनांक 28.03.2012 चे पत्र प्राप्त झाले आहे. केंद्र शासन JNNURM - II योजना लवकरच जाहीर करणार असल्याचे दिसते. सदर JNNURM - II योजनेतुन औरंगाबाद महानगरपालिकेतील विविध प्रकल्पांना निधी उपलब्ध होऊ शकतो. तथापि, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार औरंगाबाद महानगरपालिकेस शहर विकास आराखडा (CDP) तयार करणे, विविध Reforms राबविणे, विविध प्रकल्प राबविण्यासाठी रुपरेषा ठरविणे त्याअंतर्गत निविदा कार्यवाही करणे इत्यादी कामे / पुर्व तयारी करणे आवश्यक आहे.

क्रिसील संस्था ही Transaction Advisor म्हणून केंद्र शासनाच्या मान्यता प्राप्त सुचीतील संस्था आहे. तसेच यासंस्थेस अशा कामांचा अनुभव असून सध्या क्रिसील संस्था पिंपरी चिंचवड, नाशिक महानगरपालिकांमध्ये अशा प्रकारची कामे करीत आहे.

औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत Reforms and MoA Monitoring and Implementation Assistence करीता क्रिसील संस्था रुपये 5,50,000/- प्रति महिना म्हणजेच रुपये 66 लक्ष वार्षिक दराने काम करीत आहे. मुळ निविदेनुसार एक वर्षांचा कालावधी व त्यानंतर वाढविलेला तिन व चार महिन्यांचा कालावधी दिनांक 31.12.2012 रोजी संपलेला आहे. या कालावधीत क्रिसील संस्थेने केलेले काम समाधानकारक आहे.पाणी पुरवठा पीपीपी प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम येत्या महिन्याभरामध्ये सुरु होऊ शकते. Project Monitoring अंतर्गत प्रत्येक टप्प्यावर क्रिसील संस्थेची महानगरपालिकेस मदत होणार आहे. तसेच वेळोवेळी शासनाला द्यावयाचे विविध अहवाल (Quarterly Progress Report) तयार करण्यासाठी क्रिसील संस्थेची मदत होणार आहे.

केंद्र शासनाने UIDSSMT अंतर्गत मंजुर योजनांची कामे पूर्ण करण्यासाठी मार्च 2014 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे आणि केंद्र शासनामार्फत JNNURM -II ही योजना जाहीर होणार आहे. त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत Reforms and MoA Monitoring and Implementation Assistence करीता विविध कामे करण्यासाठी क्रिसील संस्थेसोबत केलेल्या करारनाम्यातील तरतुदीनुसार व निविदा मंजुर दराने म्हणजेच रुपये 5,50,000/- प्रति महिना (रुपये 66 लक्ष वार्षिक दराने ) काम करण्यासाठी केंद्र शासनाने UIDSSMT साठी दिलेल्या मुदतवाढी पर्यंत म्हणजेच दिनांक 31.03.2014 पर्यंत कालावधी वाढवुन देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 183 स्थगीत.

<u>ठराव :</u>

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

<u>विषय क्र. 184 :</u>

मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड कार्यालय 'क' येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील दुकान क्र.8 व 9 भाडे तत्वावर मिळणे संबंधाने अर्जदार श्री.किरण शिवाजी सालपे यांनी मागणी केली आहे. अर्जदाराचे विनंती संबंधाने सदर दुकाने महाराष्ट्र विद्युत महावितरण कं. चे ताब्यात असून त्यांचा कार्यालय म्हणुन वापर होत होता. विद्युत महावितरण कं. ने आता सदर दुकाने रिक्त केली आहेत. तथापी थकीत भाडे रक्कम जमा करून रिक्त दुकानांचा ताबा मनपास देणे बाकी आहे, त्या संदर्भाने कार्यवाही होऊन सदर दुकानाचा रितसर मनपाने ताबा घेतल्यानंतर ही दुकाने अर्जदारास भाडे तत्वावर देण्यात येईल, या अटीस अधिन राहुन सदर दुकाने भाडे तत्वावर देणेस मान्यता झाली आहे.

**सदर दुकानाचे एकत्रीत क्षेत्रफळ 29.84 चौ.मी. एवढे आहे. सदर दुकानाचे मासिक भाडे शिघ्र गणकाआधारे रू.6633/- एवढे आहे. याशिवाय मालमत्ता कर, इतर कर, तसेच सेवाशुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी/शर्ती लागू राहतील. करीता अर्जदार श्री.किरण शिवाजी सालपे यांचे मागणीनुसार सदर दुकाने उक्त अटीस अधिन राहून भाडे तत्वावर देण्यास झालेल्या मान्यतेसंबंधाने या दुकाना करीता मासिक भाडे रू.6633/- प्रतिमाह निश्चीत करून तीन वर्षाचे कालावधीकरीता भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.**

**मा.सभापती : विषय क्रमांक 184 मंजूर.**

**श्री.समीर राजुरकर :विषय क्रमांक 184 मध्ये मासिक भाडे 6633/- आकारण्यात आलेले आहे. ते 5000/- करण्यात यावे.**

**मा.सभापती :रूपये 5000/- करण्यात यावे. विषय मंजूर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड कार्यालय 'क' येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील दुकान क्र.8 व 9 भाडे तत्वावर मिळणे संबंधाने अर्जदार श्री.किरण शिवाजी सालपे यांचे मागणीनुसार सदर दुकाने भाडे तत्वावर देण्यास झालेल्या मान्यतेसंबंधाने या दुकाना करीता मासिक भाडे रू.6633/- प्रतिमाह ऐवजी रू.5000/- निश्चीत करून तसेच मालमत्ता कर, इतर कर, तसेच सेवाशुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी/शर्तीस अधिन राहुन तीन वर्षाचे कालावधीकरीता भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**याचबरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.**

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**